ठाणे, शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ वर्ष : १४, अंक : ८८ , पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

१४ वर्षांची यशस्वी घोडदौड
१४ वा वर्धापन दिन
दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®

अग्रलेख

**तेलंगणातील जंगलाचा सर्वोच्च प्रश्न**

सरकारी प्रकल्पांसाठी जंगलतोड केली जाण्याच्या घटना बऱ्याचदा घडल्याचे समोर आले आहे. पर्यावरण प्रेमींकडून विरोध होत असेल तर सरकारी यंत्रणा रात्रीच्या अंधारात ......पान ३ वर




YOUR BEST LINE OF DEFENCE. JUPITER ICU.

In critical situations, there is no scope of compromise. If ever your loved one is battling a serious medical condition, you want to give them the best chance to fight. The finest ICU doctors, empathetic yet competent nurses, best in class infection control practices, tools and technologies that match the finest in the world. Because on some occasion, you have to give it your best the very first time.

Bringing care into critical healthcare.

24x7 Jupiter ICU

Jupiter Hospital
Patient First

# आ. प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व २०२५ : केएसए बार्न्स स्कूलमध्ये वर्ग अंतर्गत वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

पनवेल : विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, संवादकौशल्य विकसित करणे आणि नेतृत्वगुणांना चालना देणे या उद्देशाने कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी के एस ए बार्न्स स्कूल पनवेल येथे मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेविका दर्शना भोईर, कोमल कोळी, कोशिश फाऊंडेशनचे स्वयंसेवक, शिक्षक उपस्थित होते.

या शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी माझं कुटुंब, माझं स्वप्न, माझा पहिला शाळेचा दिवस, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्त भारत अशा विषयांवर आपले विचार प्रभावी पद्धतीने मांडले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आत्मविश्वासाने भाषणं सादर करत उपस्थितांचे मन जिंकले. अनेक मुलांनी पहिल्यांदाच व्यासपीठावर उभं राहून बोलण्याचा अनुभव घेतला, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. या उपक्रमाचे आयोजन कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

मुख्याध्यापक योगिता चौधरी यांनी सांगितले, "विद्यार्थ्यांनी या स्पर्धेतून उत्कृष्ट आत्मविश्वास दाखवला. पुढील फेरीसाठी विद्यार्थ्यांनी अजून चांगली तयारी करतील, ही खात्री आहे. या वर्ग अंतर्गत फेरीतील विजेत्या विद्यार्थ्यांची पुढील शाळा अंतर्गत फेरीसाठी निवड करण्यात येणार आहे. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्पर्धा यशस्वी झाली. इयत्ता नववी मधील विद्यार्थी अभ्रम अधिकारी म्हणाला कि, "कोशिश फाउंडेशन आणि परेश ठाकूर सरांनी आम्हाला सुंदर असा मंच दिला, याबद्दल मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. या स्पर्धेमुळे मला सर्वांसमोर न घाबरता बोलण्याची संधी मिळाली आणि आता मला पुढच्या फेरीसाठी अजून चांगली तयारी करायची आहे.



# अनधिकृत इमारतींना देण्यात आलेला पाणीपुरवठा तत्काळ खंडीत करा

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मौजे शिळ येथील अनधिकृत बांधकामाच्या पाणी पुरवठ्याबाबत उच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान अनधिकृत बांधकामांना होत असलेल्या पाणीपुरवठ्याच्या अनुषंगाने तपास करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना दिले आहेत. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पुर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून आज (गुरुवार दिनांक 24/7/2025) पाणी पुरवठा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक आयुक्त दालनात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे, विधी अधिकारी मकरंद काळे, उपनगर अभियंता विनोद पवार, सहाय्यक आयुक्त व पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.




उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पुर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून आज (गुरुवार दिनांक 24/7/2025) पाणी पुरवठा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक आयुक्त दालनात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे, विधी अधिकारी मकरंद काळे, उपनगर अभियंता विनोद पवार, सहाय्यक आयुक्त व पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा दिला असल्यास त्याची कागदपत्रे तपासण्यात यावी व बांधकाम अवैध असल्यास नळसंयोजन तात्काळ खंडीत करण्यात यावे, त्याचप्रमाणे महापालिकेच्या जलवाहिनीवरुन अवैधरित्या नळसंयोजन घेतले असल्यास ते तात्काळ खंडीत करावे. तसेच यापुढे पाणीसंयोजन देत असताना महापालिकेच्या बांधकाम परवानगी शिवाय कोणत्याही अनधिकृत बांधकाम नळ संयोजन दिले जाणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी व यापूर्वी जी नळसंयोजने दिली आहे ती तात्काळ खंडीत करण्यात करण्याचे आदेशही आयुक्तांनी संबंधितांना या बैठकीत दिले.

अनधिकृत बांधकामांना नळसंयोजने देताना कागदपत्रे न तपासता नळसंयोजने दिली असतील तर त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे संकेतही आयुक्त सौरभ राव यांनी दिले. ठाणे महापालिकेच्या 9 प्रभागसमिती कार्यक्षेत्रातील अनधिकृत इमारतींना परवानगीसह व परवानगी शिवाय देण्यात आलेल्या नळसंयोजनाची यादी तयार करुन त्यानुसार देण्यात आलेली सर्व नळसंयोजने तोडून टाकण्यात यावी तसेच अनधिकृतपणे तयार केलेल्या बोअरवेलवरही कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी दिले.

# मिरा भाईंदरमध्ये वाहतूक धोरणाच्या अंमलबजावणीस सुरुवात, पहिल्या टप्प्यात ५० ठिकाणी सूचना फलक


भाईंदर : मिरा भाईंदर शहरात वाहतूक धोरणाच्या अंमलबजावणीस अखेर महापालिकेने सुरुवात केली आहे. यात वाहतूक पोलिसांच्या मदतीने आवश्यक ठिकाणी सूचना फलक उभारण्याचे काम केले जात आहे. पहिल्या टप्प्यात दीडशे पैकी पन्नास ठिकाणी हे फलक उभारले जाणार आहे. मिरारोड व भाईंदर शहरात सध्या वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक नियोजन करणे कठीण होऊ लागले आहे. यामुळे वाहतूक कोंडी, वाहनतळ प्रश्न अशा अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. शहरातील वाहतूक समस्या सुटावी यासाठी पोलीस आयुक्तालयाकडून पाऊल उचलण्यात आले आहे.यामध्ये आयुक्तालयातील वाहतूक विभागाने मिरा भाईंदर महापालिकेच्या मदतीने शहराचे सर्वेक्षण करून विशेष असे वाहतूक धोरण निश्चित केले आहे.या वाहतूक धोरणाची ऑक्टोबर २०२३ मध्ये घोषणा करण्यात आली होती.

यात शहरातील ५७ ठिकाणी पार्किंग व नो पार्किंग, नऊ एकदिशा मार्ग व दोन ठिकाणी प्रवेश बंदी करण्याचा निर्णय घेतला होता.या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सूचना फलक, निर्देशक फलक लागणे गरजेचे होते. त्यामुळे पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाने मिरा भाईंदर महापालिकेकडे प्रस्ताव तयार करून दिशा दर्शक फलक,मार्गदर्शक सूचना असे फलक लावण्यात यावे अशी मागणी केली आहे.मात्र मागील दीड वर्षांपासून याकडे दुर्लक्ष केले जात होते.अखेर आता शहरात सूचना फलक उभारण्यांचे काम करण्याचा निर्णय मिरा भाईंदर महापालिकेने घेतला आहे.यामध्ये पहिल्या टप्प्यात आवश्यक ठिकाणी फलक उभारण्यासाठी ठिकाणे सूचित करण्याचे प्रशासनाने वाहतूक पोलिसांना सांगितले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्याचा दावा वाहतूक पोलिसांकडून करण्यात आला आहे.







ठाणे, शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ वर्ष : १४, अंक : ८८ , पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

१४ वर्षांची यशस्वी घोडदौड

१४ वा वर्धापन दिन

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®

अग्रलेख

**तेलंगणातील जंगलाचा सर्वोच्च प्रश्न**

सरकारी प्रकल्पांसाठी जंगलतोड केली जाण्याच्या घटना बऱ्याचदा घडल्याचे समोर आले आहे. पर्यावरण प्रेमींकडून विरोध होत असेल तर सरकारी यंत्रणा रात्रीच्या अंधारात ......पान ३ वर



■ मुंबईतील 2006 मधील रेल्वे साखळी बॉम्बस्फोट प्रकरण

# मुंबई हायकोर्टाच्या निकालाला सुप्रीम कोर्टाची स्थगिती

**मुंबईतील 2006 सालच्या साखळी बॉम्बस्फोटप्रकरणी मुंबई हायकोर्टाने दिलेल्या निकालाला सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली आहे. हायकोर्टाने दोनच दिवसांपूर्वी 21 जुलैला निर्णय देताना 12 आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली होती. त्याला महाराष्ट्र सरकारने सुप्रीम कोर्टात आव्हान दिलं होतं. राज्य सरकारकडून महाधिवक्ते तुषार मेहता यांनी बाजू मांडली. 2006 साली मुंबईत लोकल ट्रेनमध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटात अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात अनेकांना दोषी ठरवण्यात आले होते. मुंबई उच्च न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती. त्याविरोधात महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तुषार मेहता यांनी बाजू मांडताना, जरी दोषींना निर्दोष ठरवून त्यांना जेलबाहेर सोडलं असलं तरी त्यांना जेलमध्ये परत आणण्याचा प्रश्न नाही. पण या निर्णयाचा परिणाम इतर मकोका खटल्यांवर होऊ शकतो. हा निर्णय इतर खटल्यांमध्ये वापरलं जाईल आणि त्याचा फटक पोलीस तपास आणि अन्य यंत्रणांना बसू शकतो. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने सध्या हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली. जरी निर्णयाला स्थगिती दिली असली तरी जे सर्व 11 आरोपी, (1 मयत) यांना जेलमधून बाहेर सोडलं आहे, त्यांना परत जेलमध्ये पाठवलं जाणार नाही.**

## दिलासा : निर्दोष सुटका झालेले आरोपी बाहेरच राहणार

## सर्वोच्च न्यायालयाने नोटीस जारी केली



सर्व प्रतिवादींना सोडण्यात आले आहे आणि त्यामुळे त्यांना पुन्हा तुरुंगात आणण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि कायद्याच्या प्रश्नावर आम्ही असे म्हणू की वादग्रस्त निकालाला इतर कोणत्याही प्रकरणांमध्ये पूर्वग्रह म्हणून मानले जात नाही. म्हणून त्या प्रमाणात वादग्रस्त निकालावर स्थगिती द्यावी, असं कोर्टाने नमूद केलं. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र सरकारने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीस जारी केली आहे. या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयावर तात्पुरती स्थगिती दिली आहे.कोर्टाने स्पष्टपणे सांगितले की जे आरोपी या प्रकरणात पूर्वीच निर्दोष ठरवले गेले आहेत आणि आता जामिनावर किंवा मुक्त झाले आहेत, त्यांना पुन्हा तुरुंगात पाठवले जाणार नाही. सध्या या प्रकरणातील पुढील सुनावणीची प्रतीक्षा असून सर्वोच्च न्यायालयाने संबंधित सर्व पक्षकारांना नोटीस बजावून आपली बाजू मांडण्यास सांगितले आहे.




## मुंबई हायकोर्टाचा निकाल काय?

मुंबई उच्च न्यायालयाने 21 जुलै रोजी मुंबई साखळी बॉम्बस्फोट 2006 चा निकाल दिला होता. कोर्टाने मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील (Mumba Blast Case) 12 आरोपींची निर्दोष सुटका केली.न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती एस चांडक यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना आरोपींना शिक्षा द्यावी असे पुरावे समोर आले नाहीत असं महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवलं होतं. इतकं नाही तर **(पान 4 वर )**

## मुंबईतील साखळी स्फोटात 209 जणांचा मृत्यू

मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये 11 जुलै 2006 रोजी 11 मिनिटांत झालेल्या 7 स्फोटांनी मुंबई हादरली होती. या साखळी बॉम्बस्फोटात 209 जणांचा मृत्यू झाला होता. तर 800 हून अधिकजण जखमी झाले होते. 2015 साली विशेष न्यायालयाने याप्रकरणातील 12 आरोपींना दोषी ठरवत पाच जणांना फाशी आणि सात जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या शिक्षेला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.




राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना गुरुवारी संत नामदेव महाराज यांची पगडी, सन्मानपत्र, वीणा, सन्मानचिन्ह, तुळशीहार देऊन संत शिरोमणी नामदेव महाराज पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी नामदेव महाराजांचे शेकडो अनुयायी आणि वारकरी या सोहळ्यासाठी जमले होते. **(सविस्तर वृत्त पान 4 वर)**

## तलाठ्यांपासून ते महसूल अधिकाऱ्यांची

# आता रोज फेसअॅपद्वारे हजेरी लागणार

**महसूल मंत्री बावनकुळेंची घोषणा**

मुंबई : राज्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी आता शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, तलाठ्यांपासून (Talathi) ते उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच दररोज ऑफिसमध्ये हजेरी लावावी लागणार आहे. ऑफिसमध्ये फेस अॅपवर नोंदणी झाली तरच या कर्मचाऱ्यांना यापुढे वेतन मिळणार आहे. यासंदर्भात लवकरच शासन आदेश जारी करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे (Chandrashekhar bawankule) यांनी दिली. विशेष म्हणजे महसूल कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट महिन्यातील वेतन फेस अॅपवर (App) नोंदणी केलेल्यांनाच मिळणार आहे. त्यामुळे, महसूल कर्मचाऱ्यांना दररोज कार्यालयात जाऊन आपली फेस रिडींग नोंदणी करावी लागेल, अन्यथा नोंदणी न झालेल्या दिवशी उपस्थिती नसल्याची नोंद होईल.



राज्यातील महसूल कर्मचाऱ्यांसाठी आता फेस अॅप आणि जिओ-फेन्सिंग अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र सरकारने महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी फेस अॅप आणि जिओ-फेन्सिंग प्रणाली अनिवार्य केली असल्याने कर्मचाऱ्यांची उपस्थिती आता कार्यालयातूनच नोंदवली जाणार आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्याचा पगार (सप्टेंबरमध्ये मिळणारा) केवळ फेस अॅपवर नोंदणी केलेल्या कर्मचाऱ्यांनाच मिळेल. **(पान 4 वर )**

## फेस अॅपवर नोंदणी न केल्यास गैरहजेरी

तलाठी ते उपजिल्हाधिकाऱ्यापर्यंत सर्वांनाच फेस अॅपवर नोंदणी बंधनकारक असून ज्या गावात नोकरी आहे, तिथे जात उपस्थिती लावावी लागेल. तसेच, महसूल कर्मचाऱ्यांची आता त्यांच्या कार्यालयात उपस्थिती आवश्यक असणार आहे. तर, नोंदणी न केल्यास त्या दिवशी उपस्थिती नाही, असे समजण्यात येईल. त्यामुळे, तलाठी ते उपजिल्हाधिकारीपर्यंत सर्वच महसूल कर्मचाऱ्यांना कार्यालया दररोज यावे लागणार आहे.



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## भारत - ब्रिटन मुक्त व्यापार करार

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या ब्रिटनच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यावेळी पंतप्रधान मोदी व ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यात नुकतीच द्विपक्षीय चर्चा पार पडली. या चर्चेनंतर भारत व ब्रिटनमध्ये एक ऐतिहासिक व्यापार करार करण्यात आला आहे. दोन्ही देशाच्या प्रमुखांच्या उपस्थितीत भारताचे वाणिज्य मंत्री पीयुष गोयल आणि ब्रिटनचे व्यवसाय व व्यापार सचिव जोनाथन रेनॉल्ड्स यांच्यात हा करार पार पडला. दोन्ही नेत्यांनी या व्यापार करारावर (एफटीए) स्वाक्षऱ्या केल्या. या करारामुळे उभय देशांमधील व्यापार ३४ अब्ज डॉलर्सने वाढण्याची अपेक्षा आहे. ब्रिटनसोबत भारताचा झालेला करार हा भारतासाठी फायदेशीर ठरणार आहे. मुक्त व्यापार करार दोन्ही देशांना लाभदायक ठरणार आहे. मुक्त व्यापार कराराच्या या ऐतिहासिक करारानंतर भारताचे पंतप्रधान मोदी व ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी स्टार्मर यांनी भावना व्यक्त केली की , या कराराचा भारत व ब्रिटन या दोन्ही देशांना फायदा होईल. या करारामुळे दोन्ही देशांचे उत्पन्न वाढेल, लोकांचे राहणीमान उंचावेल, नोकरदारांच्या खिशातील पैसे वाढतील, उभय देशांमध्ये अधिक नोकऱ्या निर्माण होतील. व्यवसायासाठीचे वातावरण अधिक उत्तम होईल. यामुळे वस्तूंवरील कर कमी होईल, व्यापार अजून सुलभ होईल. विशेष म्हणजे ब्रिटनने काही वर्षांपूर्वी यूरोपियन युनियनमधून एक्झिट घेतली आहे. त्यामुळे ब्रिटनलाही भारताच्या सहकार्याची आवश्यकता आहे. उभय देशांतील व्यापारी संबंध वृद्धिंगत झाले तर दोन्ही देशांना अनुकूल ठरणार आहे.

दुसऱ्या बाजूला मुक्त व्यापार कराराचा भारतालाही मोठा फायदा होणार आहे. एफटीए हा भारताचा एखाद्या विकसित देशाबरोबरचा गेल्या १० वर्षांतील पहिला मोठा द्विपक्षीय व्यापार करार आहे. तसेच २०१६ मध्ये युरोपियन युनियनमधून बार पडण्यासाठी मतदान केल्यानंतर आणि २०२० मध्ये अधिकृतपणे युरोपियन युनियनमधून बाहेर पडल्यानंतर यूकेने स्वाक्षरी केलेला हा सर्वात महत्त्वाचा करार आहे. त्यामुळे ब्रिटनचा हा स्वतंत्र करार असून या कराराद्वारे दोन्ही देशांत चांगले संबंध प्रस्थापित होतील, अशी आशा आहे. विविध वस्तूंवरील, सेवांवरील शुल्क काढून टाकणे अथवा कमी करणे हे एफटीए करार करण्याचं मुख्य उद्दीष्ट आहे. यामध्ये चामडे, कपडे व पादत्राणे यांसारख्या कामगार आधारित वस्तूंच्या निर्यातीसाठी चांगली सुविधा निर्माण करणेदेखील या करारात समाविष्ट आहे. यूके देखील व्हिस्की व कारसारख्या वस्तूंची सुलभपणे आयात करू शकेल.

बऱ्याच वर्षांपासून सुरू असलेल्या चर्चा आणि वाटाघाटींनंतर अखेर आज भारत आणि इंग्लंडमध्ये मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान किएर स्टार्मर यांच्यामध्ये आज लंडन येथे झालेल्या भेटीदरम्यान, मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत.

बऱ्याच वर्षांपासून सुरू असलेल्या चर्चा आणि वाटाघाटींनंतर अखेर आज भारत आणि इंग्लंडमध्ये मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान किएर स्टार्मर यांच्यामध्ये आज लंडन येथे झालेल्या भेटीदरम्यान, मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. या करारामुळे दोन्ही देशांमध्ये गुंतवणूक वाढणार आहे. तसेच रोजगाराच्या संधीही वाढतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

भारत आणि इंग्लंडमधील या कराराबाबत जानेवारी २०२२ मध्ये तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांच्या कार्यकाळामध्ये चर्चांना सुरुवात झाली होती. तसेच २०२४ पर्यंत हा करार पूर्णत्वास नेण्याचं लक्ष्य ठेवण्यात आले होते. दरम्यान, भारत आणि इंग्लंडमध्ये झालेल्या या व्यापार करारामुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांना गती मिळेल. तसेच नोकरीच्या संधी उपलब्ध होतीत, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. तसेच मुक्त व्यापार कराराच्या माध्यमातून भारत आणि ब्रिटनमधील द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत १२० अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत नेण्याचा दोन्ही देशांचा प्रयत्न असेल.

भारत आणि इंग्लंडमध्ये झालेल्या मुक्त व्यापार करारामधील तरतुदींनुसार भारताला आपल्या ९९ टक्के निर्यात उत्पादनांना इंग्रंडमध्ये करमुक्त निर्यात करता येणार आहे. तर ब्रिटनमधून भारतात येणाऱ्या ९० टक्के उत्पादनांवर वाजवी टॅरिफ लावण्यात येईल किंवा त्यावरी टॅरिफ हटवण्यात येईल. त्यामुळे भारतीय कंपन्यांसोबतच सर्वसामान्यांनाही मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. भारत आणि इंग्लंडमध्ये झालेल्या या व्यापार करारामुळे सर्वसामान्यांनाही बऱ्यापैकी फायदा होणार आहे. या करारामुळे औषधांपासून ते इलेक्ट्रॉनिक आणि सौंदर्य प्रसाधनांपर्यंतच्या वस्तू स्वस्त होणार आहेत. मात्र काही वस्तू ह्या महागही होती. या करारामुळे इलेक्ट्रॉनिक्स, कपडे, मरीन प्रॉडक्ट्स, स्टील आणि मेटल आणि ज्वेलरी ह्या वस्तू आता स्वस्त होऊ शकतात. तर कृषि उत्पादने, कार आणि दुचाकी, तसेच स्टीलसारख्या वस्तू महाग होऊ शकतात.

स्टार्मर यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, हा खूप महत्त्वाचा करार असून यामुळे यूकेमध्ये नव्या नोकऱ्या निर्माण होतील, व्यवासाच्या संधी वाढतील. तसेच आपल्या देशात होणारी गुंतवणूक वाढेल. या कराराशी संबंधित आम्ही एक कृतीशील आराखडा तयार केला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी अनिवासी भारतीयांना अमेरिकेत राहण्यासाठी अनेक बंधने घातली आहेत. तसेच त्यांच्यावर निर्बंध लावले आहेत. डोनाल्ड ट्रंप यांनी जगभरातील अनेक देशांना ज्यादा कर लावल्यामुळे भारत अमेरिकेशी संबंध दृढ करू इच्छित नाही. त्यामुळे ब्रिटन या देशाशी भारताने संबंध दृढ करण्याचे ठरवले आहे. ब्रिटनने आता यूरोपियन युनियनमधून बाहेर पडून स्वदेशी उत्पन्नावर भर ठेवला आहे. तसेच ब्रिटनने स्वत: ची चलननिर्मितीही केली आहे. ब्रिटन सध्या अडचणीतून मार्ग काढत आहे. परंतु तेथील शिस्तबद्धता, काटेकोर नियम ब्रिटनला वैभव निर्माण करून देतील, अशी शक्यता आहे. भारत सध्या जगभरात अर्थव्यवस्थेत चौथ्या क्रमंकावर आहे. आजचा भारत आत्मनिर्भर आहे. त्यामुळे ब्रिटनकडून भारताला काही मिळालेच तर भारतालाही ते हवे आहे. तसेच ब्रिटनही सध्या भारताकडून विकसित तंत्रज्ञानाच्या शोधात आहे. ब्रिटनचे आणि भारताचे राजनैतिक संबंध दीडशे वर्षांपासून आहेत. त्याचा फायदा भारताला होणार आहे, असे दिसते.

## बामूचा बडगा, 113 कॉलेजना दणका

**(पान 1 वरून )** यानंतर राजकीय क्षेत्रातील संस्थाचालकांनी शासनाकडे मुदतवाढ मागितली होती. त्यानुसार राज्य सरकारने नॅक नसलेल्या महाविद्यालयांना सहा महिन्यांची मुदतवाढ दिली होती. यानंतर समितीने महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या भौतिक सुविधांची पाहणी केली.

या निर्णयानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील 79, जालना जिल्ह्यातील 40, बीड जिल्ह्यातील 44 आणि धाराशिव जिल्ह्यातील 24 महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश थांबवण्यात आले आहेत.

## सहा फुटांवरील गणेशमूर्तींचे समुद्रातच विसर्जन...

**(पान 1 वरून )** महिन्यात असून पाच फुटांपर्यंतच्या एक लाख दहा हजार गणेशमूर्तींचे विसर्जन करण्याच्या दृष्टीने २०४ कृत्रिम तलावांची सुविधेची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे आणि मोठ्या मूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन करण्यात अनेक अडचणी आहेत. त्यामुळे, या मूर्तींचे समुद्र आणि अन्य नैसर्गिक तलावांतच तूर्त तरी विसर्जन करण्याशिवाय पर्याय नसल्याची भूमिका सरकार आणि महापालिकेने पुन्हा एकदा न्यायालयात मांडली.

न्यायालयाने मात्र सात हजारांहून अधिक मोठ्या मूर्तींचे समुद्रात किंवा अन्य जलस्रोतांत विसर्जन करू देऊ शकत नाही. ही संख्या फार मोठी आहे. सरकारने काहीतरी तोडगा काढावा, असे न्यायालयाने म्हटले. परंतु, सरकार आणि महापालिकेने अडचणींचा पाढा वाचणे सुरूच ठेवल्याने अखेर न्यायालयाने पाचऐवजी सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींना कृत्रिम तलावांत विसर्जनाची अट न्यायालयाने घातली. तसेच, कृत्रिम तलावांतील पीओपी मूर्तींच्या विसर्जनाची उंची पुढील वर्षी वाढवण्याची सूचना सरकारला केली. यंदाचे आदेश हे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि माघी गणपतीपर्यंत लागू राहतील, असेही न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.

## निशिकांत दुबेंना संसद भवनात मराठी महिला खासदार भिडल्या; आता मनसेने मोठा निर्णय घेतला!

**(पान 1 वरून )** त्यांच्यासाठी नक्की उभे राहू, असं अविनाश जाधव म्हणाले. भाजपच्या खासदारांकडून अपेक्षा नाही. शिवसेना शिंदे गटाचे खासदार काय करतात बघूया, अजून लोकसभेचं अधिवेशन सुरु आहे. मराठीची बाजू संसदेत मांडतात की नाही, हिंदीसक्तीबाबत काय बोलतात, बघूया, असंही अविनाश जाधव यांनी सांगितले.

**निशिकांत दुबेंनी ठाकरे बंधूंवर केला होता हल्लाबोल-** हिंदीच्या मुद्द्यावरुन मनसेप्रमुख राज ठाकरे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. यादरम्यान मनसेच्या कार्यकर्त्यांनी मीरा-भाईंदरमधील एका परप्रांतीय दुकानदाराने मराठी बोलणार नाही, असं म्हटल्याने हात उचलला. यावरुन निशिकांत दुबेंनी ठाकरे बंधूंवर हल्लाबोल केला होता. मराठी लोक कुणाची भाकर खातायत?, आमच्या पैशांवर तुम्ही मराठी लोक जगताय, असं निशिकांत दुबे म्हणाले. तसेच मराठी लोकांकडे कोणते उद्योग आहेत?, मराठी लोक किती टॅक्स देतात सांगा, असं म्हणत निशिकांत दुबेंनी मराठी लोकांना डिवचलं. खाणी आमच्याकडे आहेत, तुमच्याकडे आहेत का?, सगळे उद्योग गुजरातकडे येतायत, असंही निशिकांत दुबेंनी सांगितले. मी मराठीचा सन्मान करतो, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा सन्मान करतो. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महाराष्ट्राचा खूप मोठा सहभाग आहे. परंतु आता महानगरपालिकेच्या निवडणुका आहेत, म्हणून घाणेरडं राजकारण सुरु आहे, असा निशाणा निशिकांत दुबेंनी साधला.

## एसटी भाडेवाढ रद्द करणार, एकनाथ शिंदेंची घोषणा

**(पान 1 वरून )** आज दिली. अलीकडेच राज्य परिवहन महामंडळाने एसटीच्या भाड्यामध्ये ३० टक्के वाढ केली होती त्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही भाडेवाढ रद्द केल्याची आज पंढरपुरात जाहीर केले.

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी एकेरी गट ( एका दिशेचे ) आरक्षणावर करण्यात आलेली ३० टक्के भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे, कारण यावर प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यात हस्तक्षेप करत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना ही भाडेवाढ त्वरित मागे घेण्याचे निर्देश दिले.

## भारत आणि ब्रिटन यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार करार

**(पान 1 वरून )** डॉलर्सपर्यंत वाढू शकतो. भारतासोबतचा मुक्त व्यापार करार हा मोठा विजय असल्याचं ब्रिटनकडून मानलं जात आहे.

या मुक्त व्यापार करारामुळं भारतातून ब्रिटनला निर्यात होणाऱ्या वस्तूंवरील शुल्क ब्रिटनकडून 99 टक्के ते 100 टक्के कमी होईल. यामुळं भारतीय उत्पादनांना ब्रिटनचा बाजार खुला होईल. तर, भारताकडून देखील ब्रिटनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवरील आयात शुल्क 85 ते 90 टक्क्यांनी कमी होईल.

ब्रिटनमध्ये उत्पादित केलेलं ब्रिटीश मद्य आणि व्हिस्की याच्यावरील टॅरिफ आता 150 टक्क्यांवरुन 75 टक्क्यांवर येईल. या दशकाच्या शेवटपर्यंत ते शुल्क 40 टक्क्यांवर येणं अपेक्षित आहे. भारताकडून ब्रिटनमधून आयात केल्या जाणाऱ्या वाहनांवरील टॅरिफ 100 टक्क्यांवरुन 10 टक्क्यांपर्यंत कमी होतील.

भारतानं ब्रिटनसोबत केलेल्या व्यापार करारामुळं विदेशी निर्यातदारांसाठी भारतीय बाजार खुला होईल.

## मुंबई हायकोर्टाचा निकाल काय?

**(पान 1 वरून )** साक्षीदारांच्या साक्षी विश्वास ठेवण्यासारख्या नाहीत, स्फोटाच्या 100 दिवसांनंतर साक्षीदारांना आरोपी आठवणं अशक्य आहे, स्फोटांसाठी वापरलेले बॉंब ओळखण्यात तपास संस्थेला अपयश आलं, बॉम्बच माहित नाही तर मिळालेल्या बॉंब, बंदुका,नकाशा या पुराव्यांना अर्थ नाही, अशी निरीक्षणे नोंदवली होती.

## आता रोज फेसअ‍ॅपद्वारे हजेरी लागणार

**(पान 1 वरून )** याबाबतचा स्पष्ट शासन निर्णय लवकरच काढला जाणार आहे, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. महसूल मंत्र्यांकडून रायगड जिल्ह्यातील महसूलच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी हे आदेश दिले आहेत.

# एकनाथ शिंदेंना श्री संत नामदेव महाराज पुरस्कार

मुंबई - ज्या घरात संत नामदेव महाराज यांचा निवास होता. त्याचठिकाणी केशवराज यांच्या साक्षीने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना गुरुवारी संत शिरोमणी नामदेव महाराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नामदेव महाराजांचे 16 वे, 17 वे आणि 18 व्या वंशजांकडून हा घरगुती पुरस्कार सोहळा संपन्न झाला असून संत नामदेव महाराजांचे शेकडो अनुयायी आणि वारकरी या सोहळ्यासाठी जमले होते. यावेळी भक्तशिरोमणी श्री संत नामदेवांचे सोळावे वंशज केशव महाराज, माधव महाराज, कृष्णदास महाराज, मुकुंद महाराज हे असून निवृत्ती महाराज, हरी महाराज, एकनाथ महाराज, विठ्ठल महाराज आणि हरी महाराज हे सतरावे वंशज या सोहळ्यात सहभागी होते. विशेष म्हणजे संत नामदेवरायांचे अठरावे वंशज वैष्णव महाराज हे देखील या कार्यक्रमात उपस्थित होते.

संत नामदेव महाराज यांच्या तीन पिढ्यांकडून उपमुख्यमंत्र्यांचा हा सन्मान करण्यात आला. यानिमित्त संपूर्ण नामदेवांचा वाडा फुलांनी सजविण्यात आला आहे.

संत नामदेव महाराज यांची पगडी, सन्मानपत्र, वीणा, सन्मानचिन्ह, तुळशीहार देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्रदान करतेवेळी एकनाथ शिंदे यांच्यावर वारकऱ्याकडून पुष्पवृष्टी करण्यात आली. एकनाथ शिंदे यांना पुरस्कार देण्यासाठी सर्वच संताचे वंशज आणि वारकरी संप्रदायातील बडे महाराज मंडळी उपस्थित, आध्यात्मिक सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान झाला. विशेष म्हणजे पंढरीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार अभिजीत पाटील आणि आमदार उत्तमराव जानकर यांनी देखील हजेरी लावली होती. शिवसेना नेते असलेल्या एकनाथ शिंदे यांच्यासमवेत राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाचे आमदार आणि भाजपचे आमदार समाधान अवताडेही हेही सोबतीला होता.

## रोजगार मेळावा (प्लेसमेंट ड्राईव्ह) संपन्न

डोंबिवली- जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ठाणे व लाईट हाऊस कॉम्युनिटीइज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२५ रोजी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, याकरीता महावीर हाईट्स, पाणी टाकीजवळ, वीर सावरकर रोड, डोंबिवली (पू.) येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे (प्लेसमेंट ड्राईव्ह) आयोजन करण्यात आले होते. सदर रोजगार मेळाव्यामध्ये एकूण १० उद्योजकांनी सहभाग घेतला असून यामध्ये ६० उमेदवारांनी मुलाखती दिल्या व त्यामध्ये एकूण ४८ उमेदवारांची प्राथमिक व ७ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. याप्रसंगी या रोजगार मेळाव्यास, शेफाली शिरसेकर, केंद्र प्रमुख, लाईट हाऊस कॉम्युनिटीइज फाउंडेशन कल्पना पाटील, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे हे उपस्थित होते.

## डित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न

ठाणे - जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे व सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविदयालय यांचे संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२५ रोजी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, याकरीता सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविदयालय येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर रोजगार मेळाव्यामध्ये एकूण २० उद्योजकांनी सहभाग घेतला. एकूण २२० उमेदवारांनी मुलाखती दिल्या व त्यामध्ये एकूण ४८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन विनय सहस्त्रबुद्धे, माजी राज्यसभा सदस्य यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रशांत कदम, पोलीस उपायुक्त झोन-५, गणेश भगुरे, प्राचार्य, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, अ‍ॅड. संदीप लेले, माजी नगरसेवक तथा भाजपा जिल्हाध्यक्ष, मृणाल पेंडसे, माजी नगरसेवक, ठाणे महानगरपालिका, भरत चौहान, माजी नगरसेवक, ठाणे महानगरपालिका, प्रशांत जाधव, अध्यक्ष प्रभाग १९ भाजपा, अविनाश पवार, केंद्रप्रमुख लाईट हाऊस कॉम्युनिटीज फाऊंडेशन, ठाणे व रविंद सुरवसे, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी ठाणे हे उपस्थित होते.

## २२ जुलै रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न

नवी मुंबई - जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे व उत्कर्ष ग्रामस्थ मंडळ नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जुलै २०२५ रोजी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, याकरिता शेतकरी समाज हॉल, सेक्टर ४-अ, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर रोजगार मेळाव्यामध्ये एकूण २१ उद्योजकांनी सहभाग घेतला असून एकूण ५१० उमेदवारांनी मुलाखती दिल्या व त्यामध्ये एकूण १३९ उमेदवारांची प्राथमिक व १४ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन संजय नाईक माजी लोकसभा सदस्य, यांच्याहस्ते करण्यात आले. याप्रसंगी राजेश पाटील भाजपा जिल्हाध्यक्ष, अभिषेक पवार जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, सचिन जाधव उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई विभाग रवींद्र इथापे, माजी सभागृह नेता, भाग्यश्री चौधरी, मुख्याध्यापिका, कृष्णा पाटील, समाजसेवक, संध्या साळुंखे, सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे हे उपस्थित होते.

## निकमांकडून मराठीत राज्यसभा खासदारकीची शपथ

नवी दिल्ली : (Ujjwal Nikam Oath Ceremony) ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांनी गुरुवार दि. २४ जुलै रोजी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली आहे. राष्ट्रपतींकडून नामनिर्देशित सदस्य म्हणून त्यांची राज्यसभेवर नियुक्ती करण्यात आल्याची माहिती गृहमंत्रालयाने १३ जुलै रोजी दिली होती. दरम्यान गुरुवारी त्यांनी राष्ट्रपती नियुक्त खासदार म्हणून उज्ज्वल निकम यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली.

या शपथविधीसाठी निकम यांचे संपूर्ण कुटुंब संसदेत उपस्थित होते. विशेष म्हणजे उपसभापती यांना आवर्जून सांगत उज्ज्वल निकम यांनी मराठी मधून देखील राज्यसभा खासदारकीची शपथ घेतली. यावेळी त्यांनी भारतीय संविधानाबद्दल खरी श्रद्धा आणि निष्ठा बाळगण्याची शपथ घेतली. तसेच, भारताची सार्वभौमिकता आणि एकात्मता उन्नत राखण्याचे वचन दिले.



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt., Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/00807/18/25
Inquiry/case No. : ACC/II/254/2025
Name of the Trust : DARUL ULOOM GARIB NAWAZ TRUST
**Address of the Trust :** FLAT NO. 004, BUILDING NO. B1, DREM COMPLEX, KONGAON, KALYAN THANE, KALYAN, KALYAN
**Name of the Applicant :** Mr. ABDUL LATIF GHOLAM MOHAMMAD

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 24/07/2025.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office, Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt., Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/00344/18/25
Inquiry/case No. : ACC/III/82/2025
Name of the Trust : THE NEW VISION EDUCATION TRUST
**Address of the Trust :** OM SAI APARTMENT, FLAT NO. 104, NEAR K. B. L. SCHOOL, BADLAPUR, THANE, THANE, THANE
**Name of the Applicant :** Mrs. DIVYA DILIP MEDHEKAR

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 24/07/2025.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office, Thane

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt., Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/00248/18/25
Inquiry/case No. : ACC/III/69/2025
Name of the Trust : SUNRISE WELFARE FOUNDATION
**Address of the Trust :** KASTURI PLAZA BUILDING, SHOP NO. D-96, MANPADA ROAD, DOMBIVALI (E), THANE, THANE, THANE
**Name of the Applicant :** MS. HARSHALI LILADHAR BHARAMBE

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 24/07/2025.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office, Thane

ठाणे, शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ वर्ष : १४, अंक : ८८ , पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

१४ वर्षांची यशस्वी घोडदौड

१४ वा वर्धापन दिन

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®



अग्रलेख

### तेलंगणातील जंगलाचा सर्वोच्च प्रश्न

सरकारी प्रकल्पांसाठी जंगलतोड केली जाण्याच्या घटना बऱ्याचदा घडल्याचे समोर आले आहे. पर्यावरण प्रेमींकडून विरोध होत असेल तर सरकारी यंत्रणा रात्रीच्या अंधारात ......पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३५° से | किमान २६° से

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| १,००,६९० | १,१०,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुमचा पाणीप्रश्न कायमचा सुटला आणि खड्ड्यांचे म्हणाल तर खात्रीच्या बिल्डरला ठेका दिलाय.

# सर्पमित्रांना नवी ओळख, फ्रंटलाईन वर्करचा दर्जा

## 10 लाख रुपयांचा विमा

मुंबई : ऐ आपल्या गल्लीतल्या काळ्यांच्या घरी साप (Snake) निघालाय, एखाद्या सर्पमित्राचा नंबर असेल तर बघ बरं. अनेकदा गावखेड्यात, आता शहरी भागातील नागरी वस्तीतही साप निघाला की एखाद्या सर्पमित्राची आठवण होते. मग, सर्पमित्र देखील काही मिनिटांतच घटनास्थळी पोहोचतात, त्यानंतर विषारी असो की बिनविषारी त्या सापाला पकडून ते अज्ञातवासात, निसर्गाच्या सानिध्यात सोडून देतात. त्यामुळे, सापाच्या भीतीने या वन्यजीवास ठार मारणाऱ्यांपासून त्याची सुटका होते आणि सर्पमित्रांनाही वन्यजीव वाचविल्याचा आनंद होतो. अनेकदा या सर्पमित्रांना जीवावर उदार होऊन ही कामगिरी पार पाडावी लागते, तर काहीवेळा सर्पदंशाने जीवही गेल्याच्या घटना घडल्या आहेत. आता, याच सर्पमित्रांना शासनाकडून 10 लाख रुपयांचा अपघाती विमा मिळणार आहे. सर्पमित्रांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देत हा लाभ देण्यात येणार आहे.

आपला जीव धोक्यात घालून नागरिकांच्या मदतीला धावणारे आणि वन्यजीव असलेल्या सापांचीही माणसांच्या तावडीतून सुटका करणारे सर्पमित्र आता 'फ्रंटलाइन वर्कर' होणार आहे. शासनाकडून सर्पमित्रांना 'फ्रंटलाइन वर्कर'चा दर्जा देण्याची तयारी असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (Devendra Fadnavis) यांच्याकडे तशी शिफारस केली आहे. विशेष म्हणजे शासनाच्यावतीने या



सर्पमित्रांना अधिकृत ओळखपत्र ही दिले जाणार आहे. ग्रामीण भागात वन्यजीव आणि मानवी संघर्ष कमी करण्यासाठी, विशेषतः सर्पांपासून होणारे धोके टाळण्यासाठी मोलाची कामगिरी बजावणाऱ्या सर्पमित्रांना आता लवकरच अधिकृत ओळखपत्र आणि 10 लाख रुपयांचा अपघात विमा मिळणार आहे. त्यांना 'अत्यावश्यक सेवा' आणि 'फ्रंटलाइन वर्कर' म्हणून दर्जा देण्याबाबतही सकारात्मक विचार सुरू असून याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिफारस करण्यात येईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

### सर्पमित्रांची संख्या वाढली

एखाद्या सोसायटीच्या आवारात साप आढळला की अस्वस्थ आणि भीतीने गांगरलेले रहिवाशी आपआपला मोबाइल धुंडाळतात.मोबाइलच्या पडद्यावर येणारे काही नंबर्स दाबतात आणि पुढील अवघ्या काही मिनिटांत चार ते पाच सर्पमित्र एकाचवेळी हजर होतात. हा अनुभव शहरातील अनेकांना अनेकवेळा येतो. अलिकडच्या काळात सर्पमित्रांची वानवा जाणवत असताना अचानक सध्या त्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसते. मात्र, प्रत्यक्ष साप पकडल्यानंतर त्या कामाची थेट बातमी सोशल नेटवर्कींगसाइट्सवर झळकते. सर्पमित्रांची संख्या सध्या झपाट्याने वाढत असली तरी त्यामध्ये प्रशिक्षित सर्पमित्रांची संख्या अधिक दिसत नाही. त्यामुळे, काहीवेळा सर्पमित्रांना साप पकडताना गंभीर दुखापतही झाल्याची अनेक उदाहरणे आहेत.

### गारुडी, नागवाला बाबा काळाच्या पडद्याआड

केवळ धोका पत्करून साप पकडण्याचे काम पूर्णत्वास येत नाही. त्यासाठी योग्य प्रशिक्षण आणि वारंवार केला जाणारा सराव यांची गरज असते. या छंदाकडे केवळ प्रसिद्धी मिळण्याचे माध्यम म्हणून पाहिले जात असल्याचे लक्षात येते. सोशल नेटवर्किंग साईटसवर हाती साप घेऊन काढलेले फोटो पाहिले की अनेकांना या व्यवसायाबाबत प्रश्न पडतो, हे स्वाभाविक आहे. सर्पमित्र ही शहरांची गरज आहे आणि त्यासाठी अनेकांचे प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. कधीकाळची गारुडी, नागवाला बाबा ही संकल्पना लोप पावत असताना केवळ सर्पमित्रांचा आधार उरला आहे. त्यामुळे या क्षेत्राला अधिक महत्व आले असून आता शासनानेही त्यांच्यासाठी पुढाकार घेतल्याचं पाहायला मिळत आहे.

थोडक्यात घडामोडी

## एसटी भाडेवाढ रद्द करणार, एकनाथ शिंदेंची घोषणा

मुंबई - गौरी गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या एसटी प्रवासी आणि चाकरमान्यांसाठी एक मोठी आणि आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (MSRTC) गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी एकेरी गट ( एका दिशेचे ) आरक्षणावर जाहीर केलेली ३० टक्के भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार आणि मुंबई तसेच उपनगरातील प्रवाशांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना भाडेवाढ रद्द करण्याच्या सूचना दिली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी (पान 2 वर )

पीओपी मूर्तींबाबत उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय

## सहा फुटांवरील गणेशमूर्तींचे समुद्रातच विसर्जन...

**मुंबई - प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार करण्यात आलेल्या पाच फुटांवरील गणेशमूर्तींच्या विसर्जनाला तूर्त तरी नैसर्गिक जलस्रोतांशिवाय पर्याय नसल्याच्या भूमिकेचा राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने गुरुवारी पुनरूच्चार केल्यानंतर न्यायालयाने त्याबाबत पुन्हा एकदा असमाधान व्यक्त केले.**

तसेच, पाच फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तींना कृत्रिम तलावाची अट बंधनकारक करणाऱ्या सरकारच्या निर्णयात बदल करून ही अट सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींना लागू असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तथापि, सरकारने मोठ्या मूर्तींच्या कृत्रिम तलावातील विसर्जनाबाबत सांगितलेल्या अडचणी विचारात घेऊन न्यायालयाने या मूर्तींचे समुद्रासह अन्य नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जन करण्यास परवानगी दिली. परंतु, हे आदेश केवळ माघी गणपतीपर्यंतच लागू असतील, असेही बजावले.

विशेष म्हणजे गेल्या वर्षीपर्यंत स्वेच्छेने पीओपी मूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन केले जात होते. तथापि, यंदापासून सहा फुटांच्या मूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे, या अटीची सरकार आणि सगळ्या पालिकांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे न्यायालयाने बजावले आहे.

सात हजारांहून अधिक पाच फुटांपेक्षा अधिक उंचीच्या पीओपी गणेशमूर्तींचे समुद्रात विसर्जन करणे आम्हाला योग्य वाटत नाही. किंबहुना, आम्हाला पर्यावरणाचे कमीत कमी नुकनास हवे आहे. त्यामुळे, कृत्रिम तलावात केवळ पाच फुटांपर्यंतच्याच मूर्तींचे विसर्जन करण्याची अट सात ते आठ फुटांच्या मूर्तींपर्यंत वाढवण्यात यावी, अशी सूचना न्यायालयाने बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी सरकार आणि महापालिकेला केली होती. तसेच, त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. त्यावेळी, गणेशोत्सव पुढील (पान 2 वर )

# बामूचा बडगा, 113 कॉलेजना दणका

■ मंत्री अन् आमदारांच्या महाविद्यालयांना दणका, प्रवेश थांबवले

मुंबई - राज्यातील शिक्षणसम्राट मंत्री आणि आमदारांच्या शिक्षण संस्थांना मोठा दणका बसला आहे. या महाविद्यालयांतील प्रवेश थांबवण्यात आले आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्या परिषदेने निर्णय घेतला आहे. यानुसा भौतिक सुविधा नसलेल्या चार जिल्ह्यांतील 113 महाविद्यालयांतील पदव्युत्तरचे प्रवेश थांबवण्यात आले आहेत. यामध्ये माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, पंकजा मुंडे, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या महाविद्यालयांचा समावेश आहे.

महाविद्यालयांत प्राध्यापकांची नियुक्ती न करणे, कागदोपत्री नियुक्ती केल्यानंतर संबंधितांना पगार न देणे, बायोमेट्रिक हजेरीहसह भौतिक सुविधा उपलब्ध नव्हत्या. तरीदेखील ही महाविद्यालये चालवली जात होती. विद्यार्थ्यांचे प्रवेशही सुरू होते. तीन सदस्यीय समितीने महाविद्यालयांची तपासणी केली. त्यानंतर हा प्रकार समोर आला. त्यानंतर विद्यापरिषदेने कठोर निर्णय घेतला आहे.

विद्यापीठाच्या विद्या परिषदेसह व्यवस्थापन परिषदेने नॅक मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश थांबवण्याचा निर्णय घेतला होता. (पान 2 वर )



### या महाविद्यालयांना बसला दणका...

या निर्णयाचा फटका राजकीय नेते मंडळींना बसला आहे. कारण या नेत्यांचे कॉलेजेसचा यात समावेश आहे. फुलंब्री तालुक्यातील संत सावतामाळी महाविद्यालय राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे आहे. तसेच धाराशिवमधील आरपी महाविद्यालय (चंद्रकांत पाटील), परळीतील वैजनाथ महाविद्यालय (पंकजा मुंडे), भोकरदन येथील मोरेश्वर महाविद्यालय (रावसाहेब दानवे), मौलाना आझाद शिक्षण संस्था (सुप्रिया सुळे)

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची 5 महाविद्यालये (सतीश चव्हाण, प्रकाश साळुंके), जालन्यातील मत्स्योदरी शिक्षण संस्था (राजेश टोपे), बीडमधील आदर्श शिक्षण संस्था (जयदत्त क्षीरसागर), मुरुम येथील माधवराव पाटील महाविद्यालय (बसवराज पाटील), धाराशिवमधील तेरणा महाविद्यालय (राणा जगजितसिंह), नळदुर्ग महाविद्यालय (माजी मंत्री मधुकर चव्हाण)

# निशिकांत दुबेंना संसद भवनात मराठी महिला खासदार भिडल्या; आता मनसेने मोठा निर्णय घेतला!

नवी दिल्ली - पटक पटक के मारण्याचं वक्तव्य करून मराठी माणसाला आव्हान देणाऱ्या भाजपचे खासदार निशिकांत दुबे (Nishikant Dubey) यांना मराठी हिसका दाखवण्यात आला आहे. संसद भवनात काँग्रेसच्या मराठी खासदारांनी निशिकांत दुबेंना घेराव घालत प्रश्नांची सरबत्ती केली. काँग्रेस खादसारांच्या रूद्रावतारापुढे घाबरून निशिकांत दुबेंनी अखेर पळ काढला.

लोकसभेचं हिवाळी अधिवेशनाचं कामकाज सध्या सुरु आहे. यातच काल लोकसभेचं कामकाज तहकूब झाल्यानंतर वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकर, शोभा बच्छाव हे निशिकांत दुबे यांना शोधत होत्या. त्यानंतर निशिकांत दुबे लॉबीमध्ये येताच तिघींनी त्यांना घेरलं. यावेळी मराठी भाषिकांविरोधातली तुमची अरेरावी आम्ही खपवून घेणार नाही. तुम्ही कुणाला आणि कसे आपटून आपटून मारणार?, तुमचे वागणे योग्य नाहीय, असं काँग्रेसच्या महिला खासदारांनी सुनावलं. यानंतर वर्षा गायकवाड यांनी जय महाराष्ट्र अशा घोषणा दिल्या. त्यावर आप तो मेरी बहन है, असं म्हणत निशिकांत दुबे हात जोडून तिकडून निघून गेले.



आम्हीही या महिला खासदारांसाठी उभे राहू- अविनाश जाधव

आम्हाला पुरुष खासदारांकडून अपेक्षा होती ते काहीतरी करतील. मात्र त्यांनी काहीच केलं नाही. वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकर, शोभा बच्छाव या खासदार मराठीसाठी पुढे उभ्या राहिल्या. आज या महिला खासदार मराठीसाठी उभ्या राहिल्या वेळ आली तर आम्ही देखील (पान 2 वर )

■ मनसेकडून कौतुक; महिला खासदारांचा सत्कारही करणार-

काँग्रेसच्या महिला खासदारांच्या या भूमिकेचं मनसेचे नेते अविनाश जाधव (MNS Avinash Jadhav) यांनी कौतुक केलं आहे. मराठीच्या आवाज बुलंद केल्यामुळे मी तिन्ही भगिनींचे आभार मानतो. यासाठी धाडस लागतं आणि हे तिन्ही महिलांनी दाखवलं, त्यामुळे मी त्यांचे मनापासून आभार मानतो. सदर महिला जेव्हा अधिवेशन संपल्यानंतर मतदारसंघात येतील, तेव्हा मनसेकडून या महिला खासदारांचा सत्कार करण्यात येईल, असंही अविनाश जाधव यांनी सांगितले.

■ निशिकांत दुबेंनी ठाकरे बंधूंवर केला होता हल्लाबोल- (सविस्तर वृत्त पान 4 )



ठाणे, घोडबंदर रस्त्यावरील वाघबीळ उड्डाण पुलावर खड्डे तसेच गायमुख चौपाटी पासून ठाणे कडे येणारा रस्ता वर खड्डे पडले असल्याचे दिसून आले. (छाया - मनोज सिंह )

# भारत आणि ब्रिटन यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार करार

**लंडन : पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्रिटनच्या दौऱ्यावर आहेत. भारत आणि ब्रिटन यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार करार सहमती झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर यांनी या मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली. लंडन येथील चेकर्स येथे दोन्ही नेत्यांची भेट झाली. यूकेच्या पंतप्रधानांचं ते ग्रामीण भागातील अधिकृत निवासस्थान आहे.**

मुक्त व्यापार करारामुळं भारत आणि ब्रिटन यांच्यात आर्थिक विकासाच्या आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. प्रामुख्यानं या कराराचा भारतीय युवकांना फायदा होणार आहे. यामुळं आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याच्या संधी वाढतील. सरकारी अधिकाऱ्यांच्या

### मुक्त व्यापार कराराचे फायदे

मुक्त व्यापार करारामुळं भारतीय आयटी, टेक आणि फार्मा कंपन्यांना ब्रिटनमध्ये गुंतवणूक आणि व्यापाराच्या विस्ताराच्या नव्या संधी मिळणार आहेत.ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर यांनी दोन्ही देशांसाठी ऐतिहासिक आणि नवी सुरुवात आहे. यूकेमधील हाय टेक मशीनरी आणि इतर वस्तूंवरील टॅरिफ घटल्यानं भारतातील उत्पादन क्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. दोन्ही देशांनी स्टार्टअप, ग्रीन एनर्जी, फिनटेक सारख्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक वाढवण्यासाठी रोडमॅप केला आहे.



■ नरेंद्र मोदी आणि कीर स्टारमर यांच्याकडून स्वाक्षरी,

■ दोन्ही देशांचा व्यापार 33 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढणार

माहितीनुसार या करारामुळं तंत्रज्ञान, तंत्रज्ञान सेवा, वित्तीय सेवा, व्यावसायिक सेवा, शिक्षणाशी संबंधित सेवांचा थेट लाभ होईल.

या करारामुळं भारताच्या श्रमकेंद्री निर्यात क्षेत्र कापड, चामडे, शूज, फर्निचर, रत्न आणि दागिने, तथा खेळाशी संबंधित उत्पादनांना ब्रिटनच्या बाजारात करमुक्त पोहोचता येईल. सध्या ब्रिटन दरवर्षी 23 अब्ज डॉलर्सची अशा प्रकारची उत्पादनं आयात करतं. ज्यामुळं भारतात उत्पादन आणि रोजगारात वाढ होईल. भारत आणि ब्रिटन यांच्यात झालेल्या मुक्त व्यापार कराराचा फायदा कृषी, वस्त्रोद्योग, प्लास्टिक्स, मरिन प्रोडक्टस,रसायने आणि अभियांत्रिकी वस्तूंच्या निर्यातीचा भारताला फायदा होणार आहे. सध्या भारतीय उत्पादनांवर ब्रिटनमध्ये सरासरी आयात शुल्क 15 टक्क्यांवर आहे ते 3 टक्क्यांवर मुक्त व्यापार करारानंतर येईल.

लंडनमधील एका डेटानुसार भारत आणि इंग्लंड यांच्यातील मुक्त व्यापार करार झाल्यानंतर दोन्ही देशांमधील एका वर्षातील व्यापार 33 अब्ज अमेरिकन (पान 2 वर )

### इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिरियर डिझायनर्स या संस्थेच्या
## ठाणे चाप्टरच्या माध्यमातून प्रसिद्ध आर्किटेक्शी संवाद कार्यक्रमाचे आयोजन



ठाणे : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिरियर डिझायनर्स या संस्थेच्या ठाणे चॅप्टरच्या विद्यमाने प्रसिद्ध आर्किटेक्शी संवाद या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले होते. ठाण्यातील मानपाडा येथील अनंतम बँक्वेट हॉल येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांमध्ये प्रसिद्ध आर्किटेक जिग्नेश मोदी आणि प्रकाश सुतारिया यांनी नवोदित आर्किटेक ना मार्गदर्शन केले. ठाणे चाप्टरच्याअध्यक्षा रश्मी तिवारी यांच्या माध्यमातून सातत्याने नवोदित आर्किटेक साठी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केले जातात. संस्थेच्या अध्यक्ष रश्मी तिवारी यांनी वेल बिंग थ्रू इंटरियर डिझाईन या विषयावर मान्यवरांशी संवाद साधला. यावेळी ठाणे मुंबई तसेच कल्याण येथील आर्किटेक व इंटिरियर डिझायनर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर रामको इंडस्ट्रीज हे या कार्यक्रमाचे प्रायोजक होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिरियर डिझायनर या संस्थेच्या ठाणे चॅप्टरच्या अध्यक्षा रश्मी तिवारी यांचे प्रसिद्ध आर्किटेक जिग्नेश मोदी व प्रकाश सुतारिया यांनी विशेष कौतुक केले. यासंदर्भात माध्यमांशी संवाद साधला.

### कोपरखैरणे येथील शेतकरी समाज हॉलमध्ये
## पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न

ठाणे : जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व उत्कर्ष ग्रामस्थ मंडळ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.22 जुलै 2025 रोजी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, याकरिता शेतकरी समाज हॉल, सेक्टर 4-अ, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या रोजगार मेळाव्यामध्ये एकूण 21 उद्योजकांनी सहभाग घेतला असून एकुण 510 उमेदवारांनी मुलाखती दिल्या व त्यामध्ये एकूण 139 उमेदवारांची प्राथमिक व 14 उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन माजी लोकसभा सदस्य संजय नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई विभागाचे उपायुक्त सचिन जाधव, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संध्या साळुंखे, राजेश पाटील, जिल्हा समन्वयक शुभम शिंदे, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, मुख्याध्यापिका श्रीमती भाग्यश्री चौधरी, समाजसेवक कृष्णा पाटील, सामाजिक कार्यकर्ते अमित ढोमसे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ताजी घंगाळे यांनी केले.

# महामार्गावर प्रहार संघटनेचे चक्काजाम आंदोलन

वसई : शेतकऱ्यांचीम यासह विविध मागण्यांसाठी गुरुवारी प्रहार जनशक्ती पक्षा तर्फे मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील चिंचोटी येथे चक्काजाम आंदोलन केले. यावेळी आंदोलन कर्त्यांनी सरकार विरोधात घोषणाबाजी करीत महामार्ग अडवून धरला होता.शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी तसेच कष्टकरी, दिव्यांग, शेतमजूर, मेंढपाळ, मच्छीमार व कामगार यांच्या विविध प्रलंबित मागण्या सरकारने मान्य कराव्यात म्हणून राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन पुकारणार असल्याची घोषणा प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी केली होती.

“ याच पार्श्वभूमीवर वसईतील प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनीही मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील चिंचोटी येथे चक्काजाम आंदोलन केले. सकाळी १० वाजल्यापासून आंदोलनाला सुरुवात झाली असून मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

दरम्यान, प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने उभारण्यात आलेले हे आंदोलन तब्बल तीन तास चालले. यावेळी जय जवान, जय किसानच्या घोषणा देत आंदोलकर्त्यांनी सरकारकडे प्रलंबित मागण्या मार्गी लावण्याचे मागणी केली. तसेच अर्थसंकल्पाची प्रत जाळून सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाचा निषेध केला. तसेच मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा एकदा तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला. शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत व गोरगरीब जनतेला न्याय मिळाला पाहिजे यासाठी आम्ही रस्त्यावर उतरलो असल्याचे प्रहार जनशक्ती पक्षाचे हितेश जाधव यांनी सांगितले आहे.

पण, महामार्गावर सुरु असणाऱ्या या आंदोलनांमुळे वाहनचालकांची मात्र मोठी गैरसोय झाली. मुख्य रस्त्याच्या मधोमध सुरु असणाऱ्या आंदोलनामुळे महामार्गावर चारचाकी, दुचाकी तसेच अवजड वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे वाहनचालकांना बराच वेळ वाहतूक कोंडीत अडकून रहावे लागले.

## ‘सफाई अपनाओ – बिमारी भगाओ’ अभियानामध्ये आरोग्य शिबिरातून जनजागृती



नवी मुंबई : ‘सफाई अपनाओ – बिमारी भगाओ’अभियानाची नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून अंमलबजावणी करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज 26 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येक ठिकाणी एक अशा एकूण 26 ठिकाणी आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छता आणि आरोग्य याबाबत व्यापक जनजागृती करणा-या या 26 शिबीरांठिकाणी 11349 नागरिकांनी भेट दिली असून या शिबीरांमध्ये 755 नागरिकांचे रक्तनमुने घेण्यात आले आहेत.

25 एप्रिलपासून साथरोग व किटकजन्य आजारांबाबत जनजागृती करण्याकरिता 26 नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात सातत्याने 388 जनजागृती शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरांना 1,34,865 नागरिकांनी भेट दिली असून 8599 नागरिकांचे रक्तनमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत.

या शिबीरांमध्ये नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेसोबतच घरातील स्वच्छता, सोसायटी परिसरातील स्वच्छता व आजूबाजुची स्वच्छता यावर भर दिल्यास हिवताप / डेंग्यू, साथरोग यासारखे आजार दूर राहतील व प्रत्येक नागरिक व त्यांचे कुटुंब आरोग्यदायी राहील यावर विशेष भर देत व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे हिवताप / डेंग्यू व साथरोग आजाराबाबत अधिक जनजागृती होण्याकरीता नमुंमपा कार्यक्षेत्रात 78 नमुंमपा व खाजगी शाळांमध्ये 16929 शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत खाजगी वैद्यकिय व्यवसायिक यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

# आदिवासी पाड्यांतील समस्या जाणून घेण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेच्या 'सीईओं'ची १० किमी पायपीट

शहापूर : ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी बुधवारी सुमारे १० किमी पायपीट करत भर पावसात शहापूर तालुक्यातील दापुरमाळ या आदिवासी पाड्याची पाहणी करत तेथील परिस्थितीचे अवलोकन केले. मुंबईपासून सव्वाशे किमी अंतरावरील शहापूर तालुक्यातील दापूर माळ गावात रस्ता नसल्याने पायपीट केली. त्यानंतर अधिकाऱ्यांना या भागात सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना केल्या. रस्ता, वीज, नसल्याने शहापूर तालुक्यातील दापूर माळच्या ग्रामस्थांना सुमारे १० किलोमीटर पायी प्रवास करून मुख्य रस्त्यावर आल्यानंतर त्या ठिकाणाहून बाजार हाट किंवा रुग्णालय असा प्रवास करावा लागतो, ही गंभीर परिस्थिती बघून ते अवाक झाले.

“ दापूर माळच्या ग्रामस्थांना डोंगर दरी, नाल्यांतून पायपीट करावी लागते. गावात एखादा व्यक्ती आजारी पडलेला असल्यास किंवा एखाद्या गरोदर महिलेला रुग्णालयात घेऊन जाण्याची वेळ आल्यास त्यांना झोळी करून नेण्याची वेळ ग्रामस्थांवर येते. रस्ताच नसल्याने दापूर माळ या गावासह शहापूर तालुक्यातील ६८ गावांचा विकास झालेला नाही. त्यात दापूर माळची अवस्था वाईट आहे. रस्ता, वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण या मूलभूत सुविधांचा अभाव याठिकाणी पाहायला मिळतो. याबाबतची भयाण परिस्थिती लक्षात घेऊन बुधवारी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी पावसात डोंगर दरींतून वाट काढत पायपीट करत दापूर माळ गाठले होते.

शहापूर तालुक्यातील अतिदुर्गम आणि आदिवासी वस्ती असलेल्या दापूर माळ गावात घुगे यांनी पाहणी केली. तसेच ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या. कोणत्याही औपचारिक कार्यक्रमाविना अचानक आणि थेट गावकऱ्यांच्या दारापर्यंत पोहचल्याने ग्रामस्थांमध्ये आश्चर्य आणि आनंदाचे वातावरण होते. घुगे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्वरित उपाययोजनांचे निर्देश दिले. दुर्गम भागांतील शेवटच्या माणसापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्याचा आमचा निर्धार आहे असे रोहन घुगे यांनी यावेळी सांगितले. त्यांच्या या पायी भेटीमुळे प्रशासनाकडून गावाच्या विकासासाठी सकारात्मक पावले उचलली जातील, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## घणसोली विभागात अनधिकृत बांधकाम विरोधी तीव्र कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (2) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली कार्यक्षेत्रातील श्री.जयवंत गायकर (घरमालक व विकासक), यांनी से.21, घणसोली यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे आर.सी.सी., तळमजल्याच्या कॉलमचे काम सुरु केले होते व पहिल्या मजल्याचे स्लॅबचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसुन आले. संबधितांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 चे कलम-54 अन्वये नोटिस बजावण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हुन हटविणे आवश्यक होते. परंतु सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदरच्या ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम 07 कामगार, 03 ब्रेकर यांच्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागातील अधिकारी / कर्मचारी, तसेच पोलिस पथक तैनात होते.

यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## गृहनिर्माण संस्था व वसाहती आणि त्यामागील गल्ल्यांमध्ये सखोल स्वच्छता मोहीमा

नवी मुंबई : दैनंदिन सफाई करण्यात येत असलेल्या जागांव्यतिरिक्त ‘सफाई अपनाओ बिमारी भगाओ’ अभियानांतर्गत दुर्लक्षित जागांच्या स्वच्छतेकडेही बारकाईने लक्ष दिले जात असून आज आठही विभागात गृहनिर्माण संस्था, वसाहती व प्रामुख्याने त्यामागील गल्ल्यांमध्ये (Backlane) सफाईची विशेष मोहीम राबविण्यात आली.



“ या अंतर्गत नेरुळ विभागात से.25 येथील सफल पार्क सोसायटी याठिकाणी अंतर्गत परिसर व पाठीमागील गल्ल्या यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे वाशी विभागातही नाखवा चौक वाशी गाव येथील वसाहतींचा परिसर आणि ग्रेन मर्चंट सोसायटी से.17 वाशी परिसर व बॅकलेन या ठिकाणी सफाई मोहीम राबविण्यात आली.

तुर्भे विभागात मिलीनिअम टॉवर, से.9 सानपाडा आणि प्रभू आशिष सोसायटी से.26 याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच कोपरखैरणे विभागातील सोसायटी व रहिवासी भागातही सफाई करण्यात आली. घणसोली विभागात से.6 प्रोग्रेसिव्ह सोसायटी परिसरात व बॅकलेनमध्ये सखोल स्वच्छता करण्यात आली. ऐरोली विभागातही अय्यप्पा मंदिरा शेजारी से.14 परिसरातील सोसायट्यांच्या भागात व मागील गल्ल्यांमध्ये सफाई मोहीम राबविण्यात आली. सर्व ठिकाणच्या मोहीमांमध्ये नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता मित्र व स्वच्छता सखी यांच्या समवेत स्थानिक नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. आपण आपल्या परिसराचे व शहराचेही देणे लागतो या भावनेतून नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या मोहीमांमध्ये सहभाग घेतला. यावेळी स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. त्याचप्रमाणे उघड्यावर कचरा टाकू नये, कच-याचे घरातच वर्गीकरण करावे व वेगवेगळा ठेवलेला कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतही वेगवेगळा द्यावा अशाप्रकारे सोसायटी वसाहतीमधील नागरिकांशी सुसंवाद साधून जनजागृती करण्यात आली. बेलापूर विभागात 12 व्यावसायिक व नागरिकांवर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता करीत असल्याचे निर्देशनास आल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आली. ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ या अभियानांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 1 जुलैपासून दररोज स्वच्छता व आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत असून यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे.







‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +91-9167957771

# ठाण्याचा जुना कोपरी पूल 8 दिवस वाहतुकसाठी बंद

## ठाणे पूर्व सॅटीस पुलावर गर्डर बसविण्याचे काम

ठाणे : ठाणे पूर्व स्थानक परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी 'स्थानक परिसर वाहतूक सुधारणा प्रकल्प' (सॅटीस ) प्रकल्प राबविण्यात येत असून या प्रकल्पात रेल्वे मार्गिकेच्या दोन्ही बाजूला उभारण्यात आलेल्या खांबांवर गर्डर बसविण्याचे काम प्रलंबित होते. या कामासाठी रेल्वे विभागाने हिरवा कंदील दाखविला असून या कामामुळे सॅटिस प्रकल्पातील मोठा अडथळा दूर झाला आहे. २६ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत हे काम करण्यात येणार आहे. या कामासाठी वाहतूक पोलिसांनी ठाणे पश्चिम आणि पुर्व बाजूला जोडणाऱ्या जुना कोपरी पुलावरील वाहतूक आठ दिवस ठराविक वेळेत बंद ठेवण्याचा निर्णय घेऊन तशी अधिसुचना काढली आहे.



ठाणे पश्चिम रेल्वे स्थानकातून दररोज साडेसात लाख प्रवासी प्रवास करतात. या भागात होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी स्थानकाच्या पश्चिमेला सॅटिस पुलाची उभारणी करण्यात आली. या पुलाच्या उभारणीनंतर येथील कोंडी काही प्रमाणात कमी झाल्याचे चित्र आहे. ठाणे पुर्व स्थानक परिसरातूनही अनेक नागरिक मोठ्या संख्येने प्रवास करतात. या ठिकाणीही वाहतूक कोंडी होत असून ती कमी करण्यासाठी या स्थानक परिसरातही पश्चिमेच्या धर्तीवर 'स्मार्ट सिटी' योजनेतून सुमारे २६० कोटी रुपये खर्चुन स्थानकाच्या पूर्वेला सॅटीस प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. या प्रकल्पातील उड्डाण पुलासाठी रेल्वे रुळांच्या दोन्ही बाजूला खांबांची उभारणी काही वर्षांपुर्वी करण्यात आली. मात्र, काही तांत्रिक अडचणीमुळे याठिकाणी खांबांवर गर्डर टाकणे शक्य होत नव्हते. या अडचणी दूर करत पालिकेने रेल्वे विभागाला पत्र पाठवून मार्गिका जोडणी कामासाठी रेल्वेचे दोन तासांचे १४ मेगाब्लॉक देण्याची मागणी केली होती. त्यास रेल्वे विभागाने हिरवा कंदील देताच पालिकेने २६ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत हे काम करण्याचा निर्णय घेऊन त्याचे नियोजन आखले आहे. ४६ मीटर लांब आणि १२ मीटर रुंद गर्डर आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.

### प्रकल्पाचा आराखडा

*प्रकल्पात तुळजा भवानी मंदिर, पूर्व द्रुतगती महामार्गावरील सेवा रस्ता ते कोपरी कन्हैया नगर, एमजेपी कार्यालयापर्यंत असा एकूण २.२४ किमी लांबीचा उन्नत मार्ग असेल. यात १२ मीटर रुंद मार्गिका असतील. स्थानकात वाहतूक व्यवस्थापनासाठी ९ हजार चौरस मीटर डेक उभारणी. डेक उन्नत मार्गाला जोडण्यात येणार असून त्यात स्थानक इमारतीचाही समावेश असेल.*

### जुना कोपरी पूल वाहतुकीसाठी बंद राहणार

रेल्वे मार्गिकेच्या दोन्ही बाजूला उभारण्यात आलेल्या खांबांवर गर्डर बसविण्याचे काम २६ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत करण्यात येणार आहे. या कामादरम्यान, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी वाहतूक बदल लागू केले आहेत. यानुसार कोपरी सर्कल ते भास्कर कट दरम्यान दोन्ही बाजूच्या मार्गिकेवरील वाहतूक पूर्णपणे बंद ठेवली जाणार आहे. ही अधिसूचना २६ ते २७ जुलै, २७ ते २८ जुलै आणि २९ ते ३० जुलै या दिवशी दुपारी २ ते सकाळी ११ वाजेपर्यंत तर, २८ ते २९ जुलै, ३० ते ३१ जुलै, १ ते २ ऑगस्ट, २ ते ३ ऑगस्ट आणि ३ ते ४ ऑगस्ट या कालावधीत रात्री ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत जुना कोपरी पुल वाहतूकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

### असे आहेत वाहतूक बदल

ठाणे पश्चिमेकडुन मार्गाजवळील भास्कर कट येथून ठाणे रेल्वे स्टेशन पूर्व कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना भास्कर कट येथे प्रवेश बंद करण्यात येणार आहे. ही कोपरी सर्कल, फॉरेस्ट नाका, आनंद नगर सिग्नल, मुंबई नाशिक महामार्ग या पर्यायी मार्गे इच्छित स्थळी जातील. तीन हात नाका आणि टेलिफोन नाका येथून भास्कर कट मार्गे कोपरी सर्कल येथून ठाणे रेल्वे स्थानक पुर्वेकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना भास्कर कट येथे प्रवेश बंद' करण्यात येणार आहे. ही वाहने गुरुव्दारा, आनंद नगर सिग्नल, फॉरेस्ट नाका, कोपरी सर्कल मार्गे इच्छितस्थळी जातील. मुबई वरून हरिओमनगर कट मार्गे कोपरी कडे येणाऱ्या वाहनांना हरिओमनगर कट येथे 'प्रवेश बंद' करण्यात येणार आहे. ही वाहने आनंद नगर येथून महामार्गे मार्गे सरळ पुढे तीनहात नाका येथून युटर्न घेवुन आनंद नगर सिग्नल, फॉरेस्ट नाका, कोपरी सर्कल येथुन इच्छित स्थळी जातील. ही अधिसूचना पोलीस वाहने, अग्निशमन, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, प्राणवायु पुरवठा वाहने आणि इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

# ग्रामपंचायतींमध्ये स्टॅम्प पेपरच्या मागणीवरून वाद, जिल्हा परिषदेने दिले चौकशीचे आदेश

पालघर : ग्रामपंचायतींच्या प्रशासकीय कामकाजात आणि प्रतिज्ञापत्रांसाठी मुद्रांक (स्टॅम्प पेपर) वापरू नये, असा महाराष्ट्र शासनाचा २००४ पासूनचा आदेश असूनही पालघर जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमधील ग्रामसेवक नागरिकांकडून स्टॅम्प पेपरची मागणी करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यासंदर्भात नागरिकांनी तक्रार केल्यानंतर मागील आठवड्यात तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दोषींवर कारवाई कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

पालघर जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकीय कामकाजात ग्रामसेवक नागरिकांकडून स्टॅम्प पेपरची मागणी करत असल्याची तक्रार नांदगाव तर्फे तारापूर येथील रहिवासी ॲड. विद्युत मोरे यांनी 'आपले सरकार' पोर्टलवर १२ फेब्रुवारी २०२५ रोजी केली होती. ज्याची दखल घेत तत्कालीन जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) चंद्रशेखर जगताप यांनी ११ जुलै रोजी सर्व गट विकास अधिकाऱ्यांना (पंचायत समिती) या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आणि नागरिकांना स्टॅम्प पेपरची मागणी न करण्याबाबत सूचना देण्याचे आदेश दिले आहेत. तसेच यावर केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारदारांना अवगत करण्याची सूचनाही करण्यात आली आहे.

या आदेशामुळे पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायत प्रशासनात पारदर्शकता येण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शासनाचे नियम धाब्यावर बसवून नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करण्यास भाग पाडणाऱ्या ग्रामसेवकांवर आता कारवाईची टांगती तलवार लटकली आहे. यापुढे कोणत्याही ग्रामपंचायतीत स्टॅम्प पेपरची मागणी झाल्यास नागरिकांनी तत्काळ वरिष्ठांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अहिल्यादेवींच्या अवमान करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करा

**धनगर प्रतिष्ठानची पोलीस आयुक्तांकडे मागणी**

ठाणे : पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या अवमान प्रकरणी गुन्हा दाखल करून दोषी व्यक्तींवर कठोर कार्यवाही करावी अशी मागणी धनगर प्रतिष्ठान ठाणे जिल्हा यांनी ठाणे पोलीस आयुक्तांकडे केली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या एक महान राणी, कुशल प्रशासक व जनकल्याणकारी नेत्या म्हणून संपूर्ण भारताच्या इतिहासात त्यांचे स्थान अढळ आहे. अशा पुण्यश्लोक माता अहिल्यादेवी होळकर यांच्या विषयी सोशल मिडिया (फेसबुक) वर सुनिल गोपाळ उभे (प्रोफाईल नाव) या व्यक्तीने अत्यंत घृणास्पद, अश्लिल व अपमानास्पद शब्दप्रयोग करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. या कृत्यामुळे संपूर्ण समाजात संतापाची लाट उसळली असून हे केवळ एका थोर ऐतिहासिक व्यक्तिमत्वाचा अपमान नाही तर समाजाच्या भावना दुखावण्याचे गंभीर कृत्य आहे.सदर प्रकरणी आपण तात्काळ दखल घेऊन सदर व्यक्तीची खरी ओळख पटवून संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करून त्यावर गंभीर गुन्हा दाखल करावा आणि सदर खटला फास्टट्रॅक न्यायालयात चालवून कठोरात कठोर शिक्षा व्हावी.अशी मागणी धनगर प्रतिष्ठान ठाणे जिल्हा यांनी ठाणे पोलीस आयुक्तांकडे केली असून तसे निवेदन नौपाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय दवणे यांना देण्यात आले यावेळी त्यांना धनगर प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक कुरकुंडे, धनगर प्रतिष्ठान महिला मंडळाचा अध्यक्षा माधवी बारगीर,समाजसेवक दत्तात्रेय चिव्हाणे,धनगर प्रतिष्ठानचे खजिनदार अनिल जरग,कार्यकारणी सदस्य गणेश बारगीर, अविनाश लबडे, अरुण परदेशी, प्रशांत कुरकुंडे, अनिकेत पाडसे, किरण धायगुडे, महिला मंडळाच्या सचिव गायत्री गुंड,सुषमा बुधे,सीमा कुरकुंडे आदिसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# स्वच्छतेचा आदर्श – देहरादून पालिकेची मिरा भाईंदर पालिकेला विशेष सदिच्छा भेट

भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका हे शहर आपल्या स्वच्छतेच्या कार्याने राष्ट्रीय पातळीवर नावलौकिकास आले असून नुकताच राष्ट्रपती पुरस्काराने प्रथम क्रमांकाचे स्वच्छ शहर म्हणून सन्मानित झाले आहे. ३ ते १० लाख लोकसंख्या गटात ४५८९ शहरांमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेने अव्वल स्थान पटकावले आहे. हा क्षण मिरा भाईंदर शहरासाठी अभिमानाचा ठरला असून त्यामुळे स्वच्छतेच्या पुढील कार्यासाठी नवी ऊर्जा आणि बळ मिळाले आहेया उल्लेखनीय कार्याचा आढावा घेण्यासाठी देहरादून महानगरपालिकेच्या शिष्टमंडळाने मिरा भाईंदर महानगरपालिकेला सदिच्छा भेट दिली. या शिष्टमंडळात महापौर सौरभ थपलियाल, आयुक्त श्रीमती नमामि बन्सल (भा.प्र.से.), मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश बहुगुणा व श्रीमती पुष्पा रोथान यांचा समावेश होता. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.



त्या नंतर शिष्टमंडळ आणि मनपा अधिकारी यांच्यात शहरातील विविध स्वच्छता प्रकल्प, आधुनिक कचरा व्यवस्थापन तंत्रज्ञानसह शहरात राबवल्या जाणाऱ्या स्वच्छतेच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाविषयी सखोल चर्चा झाली. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांनी डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे कचरा संकलन, व्यवस्थापन व पुनर्प्रक्रिया या प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली. शहरातील RRR सेंटर, नारळाच्या कचऱ्यापासून तयार होणारे कोकोपीट, देशातील पहिला स्वदेशी नियंत्रित विंड्रो कंपोष्टिंग प्रकल्प, प्लाझ्मा प्रकल्प व बायोगॅस प्रकल्प यांची सखोल माहिती देण्यात आली.

याशिवाय, शाळा, हॉटेल्स महाविद्यालये व सोसायट्यांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या स्टार रँकिंग स्पर्धा, स्वच्छता की पाठशाळा अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांविषयी देखील शिष्टमंडळाला माहिती देण्यात आली.या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने देशातील पहिला स्वदेशी नियंत्रित विंड्रो कंपोष्टिंग प्रकल्पाला भेट देऊन तेथील कामकाजाचा, स्वच्छतेचा तसेच जमा होणारा ओला कचरा ते कंपोष्ट खत बनण्याचा प्रक्रियेचा आढावा घेतला.

स्वच्छतेच्या दिशेने मिरा भाईंदर महानगरपालिका भविष्यातही अशाच नवनवीन उपक्रमांद्वारे शहर स्वच्छ ठेवत इतर शहरांसाठी आदर्श ठरेल व राष्ट्रीय स्तरावर घेतलेली नोंद आता आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असे .आयुक्त यांनी सांगितले.तसेच दिलेल्या या भेटीबद्दल मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे सगळ्या मान्यवरांचे आभार मानले.

या विशेष भेटीत अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त श्रीमती प्रियंका राजपूत, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त श्रीमती कविता बोरकर, शहर अभियंता दीपक खांबीत, सहा. आयुक्त योगेश गुणीजन, स्वच्छता निरीक्षक व मनपा अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



घोडबंदर रोडवरील खड्ड्यांच्या विरोधामध्ये मनसे आक्रमक सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांना घेऊन पाहणी दौरा. गायमुख चौपाटीपासून ठाण्याकडे येणारा रस्त्याची पाहणी PWD ठाणे महानगर पालिका अधिकारी व मनसे नेते अविनाश जाधव यांनी भर पावसात यांना घेऊन पाहणी केली. (छाया : मनोज सिंह)

# केडीएमसीत भ्रष्टाचाराचा महापूर, लाचखोरांचा स्फोट

## ACB ने एकाच दिवशी 3 अधिकाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या

कल्याण : केडीएमसीमध्ये भ्रष्टाचाराचा पुन्हा एक नवा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे लाचलुचपत विभागाने म्हणजेच एसीबीने लाचखोरी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मुसक्या देखील आवळल्या आहेत. केडीएमसीच्या एखाद्या लाचखोर अधिकाऱ्याविरोधात कारवाई होण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीदेखील अनेकदा अशाप्रकारच्या घटना समोर आल्या आहेत. पण तरीदेखील या घटना कमी होण्याचं नाव घेताना दिसत नाहीत. गेल्या पाच वर्षांपासून केडीएमसीच्या निवडणुका रखडल्या आहेत. इथे अधिकाऱ्यांच्या हातात सर्व यंत्रणा आहे. पण त्याचाच अधिकारी गैरवापर करताना दिसत आहेत. यातून भ्रष्टाचाराचा महापूर येताना दिसतोय. एसीबीने आजच्या कारवाईत तब्बल 3 अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत.

केडीएमसीमध्ये एकाच दिवशी तीन अधिकाऱ्यांना ठाणे लाचलुचपत विभागाकडून रंगेहात अटक करण्यात आली आहे. पालिकेचे घनकचरा विभागाचे अधिकारी वसंत देवळूरकर, सुदर्शन जाधव यांना अटक करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांनी आजारी कर्मचाऱ्याला कामावर रुजू करण्यासाठी 25 हजार रुपयांची मागणी केली होती. लाचलुचपत विभागाने 20 हजारांची लाच घेताना दोन्ही अधिकाऱ्यांना ताब्यात घेतलं आहे. तसेच केडीएमसीच्या सहाय्यक अभियंता रवींद्र आहिरे याला बांधकाम परवानगी देण्यासाठी बांधकाम व्यावसायिकाकडून 40 हजार रुपये लाज घेताना रंगेहात अटक करण्यात आली. आतापर्यंत केडीएमसीमधील 47 अधिकारी आणि कर्मचारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात सापडले आहेत.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुका लवकरात लवकर घेण्यात याव्यात, अशी मागणी जोर धरु लागली आहे. महापालिका निवडणुका झाल्यानंतर अधिकारी वर्गाचा भ्रष्टाचार आणि मनमानी कारभरावर लगाम बसेल, असं



सामाजिक कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे.

दरम्यान, मनसे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांनी लालचलुचपत विभागाच्या कारवाईनंतर आपल्या 'एक्स' अकाउंटवर भूमिका मांडली आहे. त्यांनी 'जसे राज्यकर्ते तसे अधिकारी', अशा शिर्षकाखाली निशाणा साधला आहे. "आज पुन्हा एकदा KDMC चे ३ भ्रष्ट अधिकारी एकाच दिवशी लाचलुचपत विभागाच्या सापळ्यात सापडले. एकंदरीतच संुपूर्ण KDMC मधील जनता या भ्रष्ट सत्ताधारी आणि अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे फोफावलेल्या अनागोंदीच्या सापळ्यात अडकली आहे. परंतु याचे आमच्या शासनकर्त्यांना काहीच सोयरसुतक नाही. हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. त्यांचे नेहमीचे एकच घोषवाक्य आहे , 'अपना काम है बनता, भाड मे जाये जनता' बरोबर ना?", असा प्रश्न उपस्थिती केला आहे.







सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...
सारस्वत होम प्लस
रु. 3 कोटींपर्यंत लोन
@ 7.50 %* (p.a)
• महिला कर्जदारांसाठी 0.05% सवलत
• लोन टेक ओव्हर सुविधा उपलब्ध
• लोन इन्शुरन्स सुविधा उपलब्ध
• त्वरित मंजुरी
अधिक माहितीसाठी
9595 635 635
या नंबरवर मिस्ड कॉल द्या.
* सिबिल (CIBIL) स्कोरनुसार नियम व अटी लागू. जुलै 2025.
www.saraswatbank.com


TJSB SAHAKARI BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED BANK
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
TJSBSociety App!
Where every member's voice matters!
Build stronger connections and create a neighbourhood that truly feels like home
Advance Data Management & Reporting
Maintenance Bill Payment via UPI & Payment Gateway
Dues and Receipt Management
Complaint Management System
TJSB Society
*T&C Apply
www.tjsbbank.co.in
Toll Free: 1800 266 3466 / 1800 103 466


प्रशांत कॉर्नर ®
श्रावण पवित्रतेचा खास उपवासाच्या स्वादांचा
उपवास स्पे.
ड्रा. फराळी चिवडा
•साबुदाणा वडा •फराळी पॅटिस •उपवास कचोरी •श्रीखंडातील विविध प्रकार आणि बरच काही.
शाखा: ठाणे । भिवंडी । नवी मुंबई । कल्याण
www.prashantcorner.com
zomato SWIGGY
* काही प्रतिमा केवळ जाहिरात सादरीकरण करीता आहेत.
Creative Forum/Aries Media/2025